## 'जीवन गौरव पुरस्कार ' स्वीकारताना .. ..

उपस्थित , निमंत्रित, आणि प्रतिष्ठीत या सर्वांना माझा नमस्कार.

आज या १७व्या अधिवेशनात 'जीवन-गौरव पुरस्कार' दिल्याबद्दल मी BMM च्या कार्यकारिणीचे आभार मानते . हा सन्मान माझा एकटीचा नसून आम्हा तिघांचा, नव्हे आमच्या तिन्ही कुटुंबांचा आहे अशी माझी प्रामाणिक भावनाआहे . मे महिन्यात,BMMच्या अध्यक्षांचा –सुनील सूर्यवंशी यांचा पुरस्काराची बातमी देण्यासाठी फोन आला तेव्हा, " अहो , तुम्ही काम करायचं अणि मी award घ्यायचं हे बरोबर नाही वाटत , असं मी म्हटल्यावर " तुम्ही BMM स्थापलं नसतं तर आमचं कसल काम-" असं म्हणून त्यांनी हा पुरस्कार देण्याचा मनाचा मोठेपणा दाखवला आहे हे निश्चित . मला प्रत्यक्ष हजर रहाता आलं नाही , याबद्दल खेद वाटतो .

१ ९८४ साली आम्ही शिकागोत जेव्हा पहिले अधिवेशन करायचे ठरवले तेव्हा , अगदी घरच्या कार्यासारखे गोडबोले , वैद्य, हुपरीकर हि तिन्ही कुटुंबे कमर कसून कामाला लागली , तेव्हा कुठे ते अधिवेशन पार पड्ले. म्हणूनच हा सन्मान आम्हा तिन्ही कुटुंबांचा आहे , यात मी अतिशयोक्ती करीत नाहीये . अधिवेशन करायचं होत ते मराठी लोकांना एकत्र आणण्यासाठी . परदेशात आल्यचे काही नवे प्रोब्लेम्स, अडचणी वगैरे एकत्र येऊन बोलावे, हलके करावे हा उद्देश. तेव्हा मराठी लोक थोडेच होते. वृत्ताला मिळत असणाऱ्या प्रतिसादाच्या जोरावर अधिवेशन करण्याचे ठरवले तरी पण त्याची कार्यवाही कशी करावी, किती लोक येतील याचा अंदाज येत नव्हता. तिघांनी पैसे तर गुंतवले, परत मिळतीलच याची खात्री मुळीच नव्हती, सगळं अक्कलखाती टाकलं होतं. वृत्तातून दर महिन्याला मी आवाहन करीतच होते ,'मायमराठीची हाक, आईच्या मायेची / जुळवुनी आणा तुम्ही भेट सकळांची '

एक करमणुकीचा कार्यक्रम ठरवला,( मी भारतात गेले होते तेव्हा) परिसंवादासाठी विषय निवडले (अनेकदा आमच्यात यावर वाद-विवाद झाल्यावर), प्रमुख वक्ते ठरवले, तीनेकशे लोक बसतील अशी जागा ठरवली (नंतर दुसरी जागा घेतली, कार्यक्रम हि वाढले हे वेगळे). तिकिट २५$ ठरवले, lunch ची सोय केली. येणा-या लोकांना pickup करायची व त्यांची रहाण्याची सोयही कुणाकुणाच्या घरी केली होती. येण-यांचा खर्च कमीत कमी व्हावा हि त्यावेळची मध्यमवर्गी पद्धत त्यावेळी कुणाला यात काही चुकीचेही वाटले नाही . असं अधिवेशन अगदी साधेसुधे , कुठेही थाट माट नाही, भपका नाही. त्यावेळी गाजलेला 'दोन संस्कृतीत वाढताना " या विषयावर परिसंवाद पुन्हा कधी अनुभवला नाही . तसेच 'महाराष्ट्रफौंडेशन ' या संस्थेचे संस्थापक श्री . यशवंत कानिटकर यांचे हृदयस्पर्शी भाषण कधीही

विसरले जाणार नाही. अधिवेशनाच्या समारोपाला सगळ्या उपस्थितांना गहिवरून आले होते , ही अधीवेशनाच्या जरुरीची पावतीच होती. पुढील वर्षी टोरांटोला अधिवेशनाची सुपारी देऊनच निरोप घेतला त्यानंतर आज १७व्या अधिवेशानापर्यंतची वाटचाल वा-यासारखी ठरली ८६ साली आम्ही तिघांनी Bmm मधून निवृत्त होऊन दुस-यावर जबाबदारी सोपवली. पण त्यानंतर कधीही लुडबुड केली नाही , सांगितलेले काम करायला आमची सदैव तयारी असे पण कुणीच सांगितले नाही अध्यक्ष आले नि गेले मी सर्वांना भेटले देखील नाही . असं व्हायला नको होतं , मला वृत्त चालवायला परत कुणी विनंती केली , मी ते आनंदाने दोन वर्षे केलेही, पण नंतर बदलत्या विचारांशी जुळवून घेणे मला शक्य झालं नाही, सतत वाद घालणे मला रुचणारे नव्हते, संस्थेच्या धोरणास त्याने नक्कीच धक्का पोचत होता.

अधिवेशनाचे स्वरूप कालानुरूप बदलत गेले, संख्या वाढत होती , दोन पिढ्यांची जागा ४ -५ पिढ्यांनी घेतली , त्यामुळे सगळ्यांना रुचेल असं वातावरण ठेवण्यात आले , कार्यक्रमांची संख्या वाढतच गेली पण आता पुन्हा बदल होणे जरुरीचे वाटते सगळ्या पिढ्यांना एकत्र बोलवून नक्की काय हवं हे आपण सर्वांनी ठरवायला हवं , स्पर्धात्मक वातावरण नाहीसे करून 'तुम्ही आणि आम्ही 'ची जागा 'आपण' ने घ्यायचा प्रयत्न व्हायला हवा ज्यामुळे या सर्व समारंभाला आपुलकीचे स्वरूप येईल. आजवर झालेली प्रगती कौतुकास्पद आहे खरी, पण यापेक्षाही वरची पायरी गाठणं आपल्याला निश्चित शक्य आहे .

आज मला इतकंच म्हणावसं वाटतं 'प्रगतीने केली बीजाची आरती :बीजाचे डोळे पाणावती !

पुन्हा एकदा धन्यवाद ! पुढील कार्यासाठी अनेक शुभेच्छा आणि आशीर्वाद!

--जया हुपरीकर , स्कोकी , इलिनॉय